लोकमत



शिवाजी विद्यापीठात सोमवारी विविध फेलोशिपप्राप्त संशोधक विद्यार्थ्यांचा कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांच्यासमवेत प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. एस. पाटील, आदी उपस्थित होते.

# विद्यापीठातील ४८ संशोधकांना 'सारथी'ची फेलोशिप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील ४८ संशोधक विद्यार्थ्यांची राज्य शासनाच्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेतर्फे (सारथी) विविध फेलोशिपसाठी निवड झाली आहे. राज्यात सर्वाधिक संख्येने संशोधनवृत्ती प्राप्त केल्याबद्दल विद्यापीठातर्फे या विद्यार्थ्यांसह अन्य विविध योजनांखाली फेलोशिपप्राप्त ५७ विद्यार्थ्यांचा गौरव कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आला.

## फेलोशिपप्राप्त विद्यार्थी

'सारथी' मुख्यमंत्री विशेष संशोधन फेलोशिप : १६ विद्यार्थी

'सारथी' राष्ट्रीय संशोधन फेलोशिप : ३२ विद्यार्थी

अन्य विविध फेलोशिपप्राप्त : ५७ विद्यार्थी

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमास प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, 'आपल्या संशोधनाने एकूण सामाजिक ज्ञानामध्ये नेमकी काय भर टाकली, कोणते योगदान दिले, या बाबींकडे संशोधकांनी गांभीर्यपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. संशोधनाने सामाजिक ज्ञानामध्ये थोडी का असेना भर पडली पाहिजे, याकडे आपला कटाक्ष असला पाहिजे.' प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, वरिष्ठ संशोधक विद्यार्थ्यांनी खालील वर्गात शिकण्यासाठी दाखल झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाविषयी आस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यापीठ स्तरावरील दर्जेदार संशोधनाचा वारसा पुढील विद्यार्थ्यांमध्ये त्या माध्यमातून झिरपत राहील आणि विद्यापीठीय संशोधनाचा दर्जा अबाधित राहील.

या कार्यक्रमात अरविंद पाटील (भौतिकशास्त्र), प्रवीण शेंबडे (भूगोल) या संशोधक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. उपकुलसचिव संजय कुबल यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालये व विद्यापीठ विभागातर्फे कार्यक्रमाचे संयोजन केले.

लोकमत

## रंगीबेरंगी ७६ प्रकारच्या फुलांचा समावेश; तलाव, विहिरी भरल्या काठोकाठ

# शिवाजी विद्यापीठ परिसरात 'फुलोत्सव'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** रंगीबेरंगी फुलांनी सध्या शिवाजी विद्यापीठाचा परिसर फुलला आहे. कॉसमॉस, मेक्सिकन सनफ्लॉवर, कुर्डू, सीतेचे आसू, केना, अकेशिया, अशा विविध ७६ प्रकारांचा फुलांचा त्यामध्ये समावेश आहे. या फुलांमुळे विद्यापीठाच्या निसर्गसौंदर्यात भर पडली आहे.

नसीर अत्तार



**शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग परिसरातील तलाव पाण्याने काठोकाठ भरला आहे.**

पावसाचा प्रारंभ झाल्यानंतर विद्यापीठात विविध प्रकारची फुले फुलण्यास सुरुवात होते. यंदा त्याची सुरुवात जुलैपासून झाली आहे. विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रासमोरील खडकाळ भागात केना गवताची जांभळी, गुलाबी आणि पांढरी फुले दिसून येत आहेत. पश्चिम भागात असलेल्या मुलांचे वसतिगृह ते कॅंटिन, आरोग्य केंद्र ते संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग मार्गाच्या बाजूने कॉसमॉसची केशरी, पिवळा आणि गुलाबी रंगांची फुले आणि रसायनशास्त्र अधिविभाग ते सिंथेटिक ट्रॅक या मार्गावरील परिसरात फुललेली गुलाबी रंगांची फुले लक्ष वेधून घेत आहेत. मुलांच्या वसतिगृहामागील बाजूला काहीसा केशरी आणि लाल रंगाच्या मेक्सिकन सनफ्लॉवरच्या फुलांची पसरलेली चादर मनमोहक दिसत आहे. क्रीडा अधिविभागाच्या मैदान परिसरात सीतेचे आसू या प्रकारची फुले दिसून येत आहेत. या रंगीबेरंगी फुलांमुळे निसर्गाचे वेगळे रूप याठिकाणी पाहण्यास मिळत आहे. ऑक्टोबरच्या अखेरच्या आठवड्यापर्यंत ही विविध प्रकारची फुले याठिकाणी पाहायला मिळतील. वि. स. खांडेकर भाषाभवनामागील आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या परिसरातील तलाव आणि विविध नऊ विहिरी काठोकाठ भरल्या आहेत. ही फुले आणि निसर्गरम्य वातावरण मोबाईलमध्ये टिपण्यासाठी त्या परिसरात छायाचित्रे आणि सेल्फी घेण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

### पांढऱ्या रंगाचे कृष्णकमळ

कृष्णकमळ हे अधिकतरवेळा जांभळ्या रंगांचे असते. मात्र, विद्यापीठातील सुतार विहीर परिसरात पांढऱ्या रंगाचे कृष्णकमळ फुलले आहे. ते लक्ष वेधून घेत आहे.

> शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात रानफुलांचे प्रमाण वाढत आहे. त्यामध्ये आणखी फुलांची भर घालण्याचा प्रयत्न उद्यान विभाग करत आहे. क्वचित दिसणाऱ्या फुलझाडे आणि वनस्पतींची संख्या जाणीवपूर्वक वाढविण्यात येत आहे.
>
> - डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ





**शिवाजी विद्यापीठाचा परिसर विविध फुलांनी बहरुन गेला आहे. त्यामुळे निसर्गाचे एक वेगळेच सौंदर्य याठिकाणी पाहायला मिळत आहे.**

लोकमत



शिवाजी विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागात गुरुवर्य कृतज्ञता कार्यक्रम घेण्यात आला. त्यामध्ये विभागाच्या माजी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

# 'गुरुवर्य कृतज्ञता सोहळा' उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागात 'गुरुवर्य कृतज्ञता सोहळा' साजरा करण्यात आला. या अंतर्गत विभागाच्या माजी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. प्र. नि. वासंबेकर होते.

कोणत्याही शिक्षकाने आपण त्या संस्थेचे प्रथम सेवक आहोत, ही भावना दृढ करावी, असे मत प्रा. डॉ. एस. एच. चव्हाण यांनी व्यक्त केले. प्रा. ए. एस. वायंगणकर, ए. वाय. खोत, सी. एस. शाळगावकर, एम. डी. उपलाने यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. पी. ए. कदम, एस. ए. शिंदे, एस. एम. मस्के, ए. जे. पवार यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. यावेळी संशोधक विद्यार्थ्यांसह एम. एससी. भाग १ व भाग २ चे विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत केले. अधिविभागाची वाटचाल, प्रगती व भविष्यातील रोडमॅप या संदर्भात प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी माहिती दिली. डॉ. एम. के. भानारकर यांनी आभार मानले.

पुढारी

# संशोधनाचे सामाजिक ज्ञानवृद्धीत योगदान आवश्यक

## कुलगुरू : 'सारथी' फेलोशिपप्राप्त संशोधक विद्यार्थ्यांचा गौरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आपल्या संशोधनाने सामाजिक ज्ञानामध्ये नेमकी काय भर टाकली, कोणते योगदान दिले या बाबीकडे संशोधकांनी गांभीर्यपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील ४८ संशोधक विद्यार्थ्यांची राज्य शासनाच्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेतर्फे (सारथी) विविध फेलोशीपसाठी निवड झाली आहे. राज्यात सर्वाधिक संख्येने संशोधनवृत्ती प्राप्त केल्याबद्दल विद्यापीठातर्फे या विद्यार्थ्यांसह अन्य विविध योजनांखाली फेलोशीपप्राप्त ५७ विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ झाला.



**गौरव समारंभात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. (छाया : नाज ट्रेनर)**

यावेळी ते बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांचे भाषण झालले. अरविंद पाटील (भौतिकशास्त्र), प्रवीण शेंबडे (भूगोल) यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एस. पाटील यांनी केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले.

### फेलोशिपप्राप्त संशोधक विद्यार्थी

'सारथी' योजनेंतर्गत मुख्यमंत्री विशेष संशोधन फेलोशिप-२०१९ (१६ विद्यार्थी), 'सारथी' राष्ट्रीय संशोधन फेलोशिप - २०१९ (३२ विद्यार्थी); अन्य विविध फेलोशिपप्राप्त (५७ विद्यार्थी) - एकूण १०५ विद्यार्थी.

# 'लिब्ज' तंत्रज्ञान महत्त्वाचे : राय

उजळाईवाडी, ता. ७ : पदार्थविज्ञानाच्या संशोधनात लेझर इंडयुस्ड ब्रेकडाऊन स्पेक्ट्रोस्कोपी अर्थात लिब्ज हे तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन अलाहाबाद विद्यापीठातील प्रा. डॉ. ए. के. राय यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागात आयोजित 'लिब्ज- अ पोटेंशिअल ॲनॅलिटिकल टूल फॉर द कॅरेक्टराझेशन ऑफ मटेरिअल्स' विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रा. राय म्हणाले, की लिब्ज तंत्रज्ञानाचा उपयोग करून पदार्थामधील मूलद्रव्य घटकांचा अभ्यास करता येतो. स्पंदित लेझर पदार्थावर आदळल्यानंतर तेथे तयार होणारा प्लाझ्मा ऑप्टिकल फायबर डिटेक्टरच्या मदतीने पडताळला जातो. या प्लाझ्माच्या अभ्यासातून विविध मूलद्रव्यांच्या अस्तित्वाचे मूल्यमापन करता येते. या तंत्रज्ञानाचा उपयोग करून पाण्यात मिश्रित झालेल्या क्रोमिअमसारख्या घटकांचा अभ्यास करून त्या पाण्याच्या दर्जाबाबत अत्यंत काटेकोर विश्लेषण करता येते.

# विभागीय मैदानी स्पर्धेस उद्या प्रारंभ

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत कोल्हापूर विभागीय मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार (ता. ९) ते ११ ऑक्टोबर दरम्यान शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर स्पर्धा होणार आहे. स्पर्धेचे आयोजन न्यू कॉलेजतर्फे करण्यात आले आहे. स्पर्धेचे उद्घाटन बुधवारी वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष मालोजीराजे छत्रपती यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे. क्रीडाक्षेत्रातील योगदानाबद्दल प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संस्थेचे चेअरमन व राष्ट्रपती पदक विजेते डी. बी. पाटील यांचा गौरव करण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ६५ महाविद्यालयांतील ७०० खेळाडू सहभागी होणार आहेत, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी दिली. यावेळी महाविद्यालयाचे जिमखाना विभागप्रमुख प्रा. अमर सासने व सूरज झिटे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2019
तरुण भारत

# ‘संशोधकांकडे संकल्पना स्पष्ट हव्यात’

प्रतिनिधी
कोल्हापूर

संशोधन कशासाठी करतो आहोत, यासंदर्भात संशोधकांच्या मनात संकल्पना स्पष्ट असल्या पाहिजेत. संशोधनाने सामाजिक ज्ञानात भर पडली पाहिजे. समस्येचे उत्तर शोधण्यासाठी संशोधकांनी प्रयत्न करायला हवेत. त्याअंतर्गत ज्ञान शोधण्याची कला अवगत करणे, विकसित करणे, सशक्त निरीक्षण कौशल्याचा विकास करणे या गोष्टीही संशोधन प्रक्रियेतूनच साध्य होतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.


शिवाजी विद्यापीठातील ४८ संशोधक विद्यार्थ्यांची महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेतर्फे (सारथी) विविध फेलोशिपसाठी निवड झाली आहे. राज्यात सर्वाधिक संख्येने संशोधनवृत्ती प्राप्त केल्याबद्दल विद्यापीठातर्फे या विद्यार्थ्यांसह अन्य विविध योजनांखाली फेलोशिपप्राप्त ५७ विद्यार्थ्यांचा गौरव कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. पुरस्कारप्राप्त अरविंद पाटील (भौतिकशास्त्र) व प्रवीण शेंबडे (भूगोल) या संशोधकांनी मनोगत व्यक्त केले. उपकुलसचिव संजय कुबल यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे संयोजन केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात फेलोशिपप्राप्त संशोधक विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. शिर्के, कुलसचिव डॉ. नांदवडेकर, डॉ. पी. एस. पाटील.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 OCT 2019
तरुण भारत

# ‘कोपनहेगन’ नाटकाला प्रेक्षकांचा प्रतिसाद



कोल्हापूर : ‘कोपनहेगन’ नाटकातील एक प्रसंग सादर करताना डॉ. शरद भुताडिया, सागर तळाशीकर, मेघना भागवत.

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रत्यय नाट्यसंस्था प्रस्तुत संगीत व नाट्यशास्त्र विभाग व विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील आयोजित ‘कोपनहेगन“ या नाटकाला रसिकांनी टाळ्यांनी प्रतिसाद दिला. मूळ मायकल फ्रायन यांच्या नाटकाचा डॉ. शरद नावरे यांनी मराठी अनुवाद केला आहे. ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक डॉ. शरद भुताडिया, अभिनेता सागर तळाशीकर व अभिनेत्री मेघना भागवत यांनी साकारलेल्या भुमिका रसिकांना प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळाला.